■ वर्ष-०८ ■ अंक-२३ ■ मुंबई, मंगळवार २६ एप्रिल ते ०२ मे - २०२२ ■ पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 चोरीच्या संशयावरून वॉचमनचा खून; 7 आरोपींना पोलीस कोठडी

3 → अल्पवयीन मुलीचे अपहरण, अत्याचार अन् खून; आरोपीला फाशीची शिक्षा

मुलीला सासरी पाठवले नाही म्हणून जावयाने केला सासऱ्याचा खून, आरोपी अटकेत ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार

स्वयं रोजगाराची उत्तम संधी.

एका अग्रगण्य नामांकित कंपनीत वित्तीय सल्लागार/ टीम लीडर, म्हणून काम करा आणि उज्ज्वल आयुष्य घडवा.

उत्पन्न 25000/- अधिक

शिक्षण : बारावी पास.

संपर्क: 9833242929

# डोळ्यात मिरची पूड टाकली, त्यानंतर चाकूचा धाक दाखवला अन् व्यापाऱ्याला लुटलं

## डोळ्यात मिरचीपूड टाकली आणि त्यानंतर चाकूचा धाक दाखवत त्यांनी व्यापाऱ्याला लुटलं. पोलिसांनी ठोकल्या बेड्या.



खाकरा तयार करण्याच्या कारखाना असलेला एक वृद्ध व्यापारी कारखाना बंद करुन आपल्या घरी परतत होता. त्यावेळी एका तरुणानं वृद्ध व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकली. त्यानंतर चाकूचा धाक दाखवत या व्यापाऱ्याकडील पैसे घेऊन हा लुटारु तरुण पसार झाला. मानपाडा पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करत लूट करणाऱ्या तरुणासह त्याच्या साथीदाराला अटक केली आहे. विशेष म्हणजे, यातील एक आरोपी खाकरा व्यापाऱ्यासोबत काम करणारा होता.

डोंबिवली पूर्व पीएमटी कॉलनी परिसरात 62 वर्षीय गांगजी घोसर हे खाकरा तयार करण्याचा कारखाना चालवितात. 19 एप्रिल रोजी सायंकाळी पावणे आठ वाजण्याच्या सुमारास खाकऱ्याची ऑर्डर देण्यासाठी जय भद्रा हा तरुण त्यांच्या कारखान्यात आला. ऑर्डरनुसार, त्यानं काही पैसे दिले. गांगजी हे घरी जाण्याच्या तयारीत होते. त्यांनी त्यांच्या जवळील 35 हजार रुपये एका काळ्या रंगाच्या पिशवीत ठेवले. याच दरम्यान एक अनोळखी इसस तिथे आला. त्यानं त्याच्या हातातील मिरचीची पूड गांगजी यांच्या डोळ्यात टाकली. चाकूचा धाक दाखवित त्यांच्या हातातील रोकडची पिशवी घेऊन पसार झाला. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, लुटणारा तरुण हा येता-जाता सीसीटीव्हीत कैद झाला होता. मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक शेखर बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी अविनाश वनवे यांनी तपास सुरु केला. जयने पैसे दिल्यावर हा प्रकार घडल्यानं पोलिसांचा जयवर संशय होता. पोलिसांनी जय भद्राला ताब्यात घेत चौकशी केली. पोलिसी खाक्या दाखवताच त्यानं कबुली दिली. त्यानं सांगितलेल्या माहितीनंतर या प्रकरणातील लुटारू जितेंद्र जोशी याला अटक केली. जय भद्रा आणि जितेंद्र जोशी यांनी संगनमत करुन गांगजी यांना लुटलं होतं. या दोघांनी यापूर्वी असा प्रकार केला आहे का? याचा तपास पोलीस करत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त जे. डी. मोरे यांनी दिली आहे.

# सख्ख्या भावांचं अपहरण, अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



अंबरनाथ शहरात दोन सख्ख्या भावांचं अपहरण झाल्याची घटना समोर आली आहे. अपहरण झालेले हे दोघे भाऊ अल्पवयीन आहेत. याप्रकरणी अंबरनाथ पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल झाला ...पान २ वर...

# नालासोपारा पश्चिमेला अग्नितांडव

## पाच ते सहा दुकाने जळाली, ३० पेक्षा अधिक दुचाकी पेटल्या



नालासोपारा पश्चिमेकडील गॅलक्सी हॉटेल शेजारील दुकानांना लागलेल्या आगीत पाच ते सहा दुकाने जळून खाक झाली असून पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या दुचाकींचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आज दुपारी चार वाजताच्या सुमारास येथील एका गादीच्या दुकानाला आग लागली. या दुकानात असलेला कापूस व कपड्यामुळे ही आग वाढत गेली व आजूबाजूला असलेली आठ ते दहा दुकानेही या घटनेत जळाली. या दुकानाच्या मागे असलेल्या पार्किंगमध्येही आग पसरल्याने ३० ते ३५ दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. यावेळी वेळी नागरिकांनी प्रसंगावधन दाखवत पार्किंगमधल्या दुचाकी बाहेर काढल्या अन्यथा अनेक गाड्या या आगीत जळून खाक झाल्या असत्या. या घटनेची माहिती वसई पालिकेच्या अग्निशमन पथकाच्या जवानांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी पोहचून आगीवर नियंत्रण मिळविले मात्र या आगीत लाखो रुपायांचे नुकसान झाले आहे.

# अन् दारुड्याने पोलिसाच्याच कानशिलात लगावली




ठाणे - नवरा बायकोच्या घरगुती भांडणात मद्यधुंद अवस्थेत असलेला नवरा दरवाज्यावर लाथा मारत असल्याची पोलिसांना फोनवरून तक्रार आली. त्यानुसार पोलीस कर्मचाऱ्याने नवऱ्याला पोलीस ठाण्यात पकडून आणले असता, नवऱ्याने पोलीस ठाण्यातच धिंगाणा घालत पोलिसाच्या कानशिलात लगावल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात नवऱ्यावर विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. रितेश चिंदू चव्हाण (वय ३४, रा. उल्हासनगर) असे अटक केलेल्या नवऱ्याचे नाव आहे.

नवऱ्याला घाबरून बायकोने केला पोलीस ठाण्यात फोन : नवरा रितेश हा उल्हासनगरमधील गजानननगर परिसात राहतो. नवरा बायकोमध्ये घरगुती वाद झाल्याने पत्नीने घटस्फोट मिळावा म्हणून न्यायालयात दावा केला. तेव्हापासून नवरा बायकोमध्ये वाद आधीच वाढल्याने आरोपीची बायको भिवंडी तालुक्यातील पिपंळघर येथील एका इमारतीमध्ये एकटी राहते. त्यातच बायको आपल्याला सोडून एकटी राहत असल्याचे पाहून रितेश उल्हासनगरहुन २४ एप्रिल रोजी संध्याकाळच्या सुमारास ती राहत असलेल्या घरी आला. त्यावेळी बायकोने नवरा आल्याचे पाहून दरवाजा बंद केल्याने त्याने शिवीगाळ करत दरवाज्याला लाथा मारण्यास सुरुवात केली. या घटनेने घाबरून बायकोने कोनगाव पोलीस ठाण्यात फोन करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलीस नाईक पांडुरंग वणवे हे घटनास्थळी येऊन मद्यधुंद अवस्थेत असलेल्या नवऱ्याला पकडून पोलीस ठाण्यात आणले. पोलीस ठाण्यातील दालनातच धिंगाणा : पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक (गुन्हे) पवार यांच्या दालनात त्याला हजर करून पवार यांनी त्याच्याकडे नाव पत्ता विचारला असता त्याने सांगण्यास नकार देऊन पोलीस ठाण्यातील दालनातच धिंगाणा घातला. हे पाहून पोलीस नाईक वणवे यांनी त्याला शांत राहण्याचा सल्ला दिला. मात्र आरोपी नवऱ्याला त्याचा राग येऊन खाकी वर्दीत असलेले पोलीस नाईक वणवे यांना शिवीगाळ व धमकी देत, त्यांच्या कानशिलात लगावली. त्यामुळे पोलीस ठाण्यात अधिकच गोधंळ उडाला होता. नवऱ्याची रवानगी पोलीस कोठडी : त्यानंतर पोलिसांनी नवऱ्याला ताब्यात घेऊन पोलीस नाईक वणवे यांच्या तक्रारीवरून विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करत त्याला अटक केली आहे. आज (२५ एप्रिल) आरोपी नवऱ्याला न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक अभिजित पाटील करत आहेत.

# राष्ट्रपती राजवट लावायची असेल, तर उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात एकत्रच लावा : संजय राऊत



भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांच्या कारवर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यानंतर भाजपचे शिष्टमंडळ दिल्लीत केंद्रीय गृहसचिवांच्या भेटीला गेले. मात्र किरीट सोमय्यांच्या या भेटीवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी टीका केली आहे. शिवाय, 'राष्ट्रपती राजवट लावायचीच असेल, तर ती उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र दोन्हीकडे एकाच वेळी लावावी', असा टोलाही लगावला. मुंबईत पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांनी भाजपवर टीका केली. यावेळी बोलताना त्यांनी उत्तर प्रदेशात 17 बलात्कार झाले असल्याचा दावा केला. त्याचीही माहिती केंद्रीय गृहसचिवांना द्यावी, असा टोला राऊत यांनी लगावला. गेल्या दोन वर्षात अनेकदा भाजपचं शिष्टमंडळ केंद्रीय गृहसचिवांना भेटले. महाराष्ट्रातील कायदा सुव्यवस्थेबाबत तक्रारी असतील, तर तुम्ही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांची भेट आधी घ्या, असा सल्ला राऊतांनी यावेळी दिला आहे.

# धक्कादायक ! गुरू शिष्याच्या नात्याला काळिमा

## स्पोर्ट्स कोचकडून विद्यार्थिनीवर अत्याचार



डोंबिवलीत गुरू शिष्याच्या नात्याला काळिमा फासणारी धक्कादायक घटना घडली आहे. एका स्पोर्ट्स कोचने विद्यार्थिनीवर अत्याचार करत तिला अमानुष मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याबाबत पीडितेने मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली असून मानपाडा पोलिसांनी या कोचला बेड्या ठोकल्यात आहेत. रामेश्वर पाठक असे संशयिताचे नाव आहे. डोंबिवलीत राहणारी 27 वर्षीय पीडित तरुणी 2012 साली शाळेत असताना एका राज्यस्तरीय स्पर्धेसाठी गेली होती. यावेळी तिचा कोच असलेल्या रामेश्वर पाठक याने त्या तरुणीसोबत ओळख वाढवत प्रेमसंबंध प्रस्थापित केले. काही कालावधीनंतर दुसऱ्या मुलांशी बोलते म्हणून रामेश्वर हा या तरुणीला मारहाण करू लागला. या तरुणीला रामेश्वर याने 18 मार्च 2022 रोजी डोंबिवलीत रॉडने अमानुष मारहाण केली. या मारहाणीत पीडित तरुणीचा पाय फ्रॅक्चर झाला. मारहाणीनंतर पीडित तरूणीला अर्धनग्न फोटो व्हायरल करण्याची धमकी देत तिला ब्लॅकमेल केलं. अखेर या तरुणीने एका सहकाऱ्याच्या मदतीने मानपाडा पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दिली. यानंतर मानपाडा पोलिसांनी रामेश्वर पाठक याच्याविरोधात बलात्कार, गंभीर मारहाण यासह माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करत त्याला बेड्या ठोकल्या. त्याला आज न्यायालयात हजर केलं जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# माता न तू वैरिणी! आईने स्वत:च्याच पाच महिन्याच्या मुलाचा घोटला गळा

सातारा जिल्ह्यातील तरडगाव येथे एक मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. स्वत: च्याच पाच महिन्याच्या मुलाचा उशिने तोंड दाबून खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आरती गायकवाड असे संशयित आरोपी महिलेचे नाव असून पोलिसांनी तिला अटक केली आहे.

उशिने तोंड दाबून खून केल्यानंतर याबाबतची माहिती स्वत:च आईने पोलिसांना दिली. माहिती मिळाल्यानंतर लोणंद पोलिसांनी तिला अटक केली आहे. सातारा जिल्ह्यातील तरडगाव येथे 12 एप्रिल रोजी आपल्या पाच महिन्याच्या मुलाचा ब्लॅंकेटमध्ये गुदमरुन मृत्यू झाल्याचे आरतीने गायकवाड हिने गावात सर्वांना सांगितले. त्यानंतर कुटुंबीयांनी आणि ग्रामस्थांनी मृत बाळावर अंत्यसंस्कार केले. परंतु, आपण केलेली ही मोठी चूक आहे हे या लक्षात आल्यानंतर तीने स्वत:च लोणंद पोलिसांना फोन करुन मी माझ्या बाळाचा खून केल्याचे सांगितले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी आरती गाडकवाड हिला तिच्या घरातून ताब्यात घेतले. पोलिसांनी तिच्याकडे अधित चौकशी केल्यानंतर तिने खुनाची कबुली दिली. चौकशीनंतर पोलिसांनी आरती गाडकवाड हिला अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने तिला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान बाळाचा खून कोणत्या कारणामुळे केला याचे कारण अद्याप समजू शकले नाही.

# पुण्यात भांडी घासण्याच्या कारणातून वाद

## चाकूने भोसकून रूममेटचा खून




पुणे - मला भांडी घासायला सांगतोस, असे म्हणत रूमवर एकत्र राहत असलेल्या कामगार मित्रानेच दुसऱ्या मित्राचा चाकूने भोसकून खून केला. पुण्यातील बाणेरमध्ये ही घटना घडली. अमर बसंत मोहपात्रा (वय 28) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर या प्रकरणी चतुर्श्रुंगी पोलिसांनी अनिलकुमार सरतकुमार दास (वय 21) याला अटक केली आहे. मृत मोहपात्रा आणि आरोपी दोघेही मूळचे ओडिशाचे राहणारे आहेत. ही घटना शुक्रवारी रात्री ९.४० च्या सुमारास घडली. काय आहे प्रकरण? - याप्रकरणी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, मूळचे ओडिशाचे असलेले तीन कामगार पुण्यात काम करतात. हे तिघेही बाणेरमधील एकाच सोसायटीत राहतात. त्यादिवशी कामावरून परतल्यानंतर सकाळची राहिलेली भांडी घास, असे अमर याने अनिल कुमार दास याला सांगितले. यावरून आरोपी अनिलकुमार सरतकुमार दास याने रागाच्या भरात तू मला भांडी घासायला कसा काय सांगतो, असे म्हणत किचनमधील भाजी चीरायचा चाकू घेऊन अमर याच्या छातीत खुपसला. वार इतका भयंकर होता की अमर मोहपात्रा या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच चतुर्श्रुंगी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आरोपी अनिलकुमार सरतकुमार दास याला अटक केली.

# सर्वांना कायदा समान, वेगवेगळी भूमिका घेता येणार नाही - गृहमंत्री दिलीप वळसे पाटील



मुंबई - भोंग्यांवरून राज्यात घमासान सुरू असले तरी कायदा सर्वांना समान आहे. एका विशिष्ट समाजा संदर्भातील भूमिका घेताना त्याचे परिणाम खेडेगावात होतील. त्यामुळे वेगवेगळ्या लोकांसाठी वेगळी भूमिका घेता येणार नाही. सर्वांसाठी एकच भूमिका घ्यावी लागेल, अशी सडेतोड भूमिका गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी मांडली आहे. केंद्र सरकारने भोंग्या संदर्भात राष्ट्रीय पातळीवर धोरण जाहीर करावे, अशी मागणी वळसे पाटील यांनी केली आहे. सह्याद्री अतिथीगृहात आज (सोमवारी) झालेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते.सर्वपक्षीय बैठक : भोंग्यांसंदर्भात मार्गदर्शक तत्वे ठरवण्यासाठी राज्य सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. बैठकीला राजकीय पक्षांच्या प्रमुखांना बोलविण्यात आले होते. भाजपासह अन्य काही नेत्यांनी बैठकीकडे पाठ फिरवली. मात्र राज्य सरकारने घेतलेल्या बैठकीत, कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे काम राज्य सरकारचे आहे. त्यामुळे त्यादृष्टीने घेतल्या जाणाऱ्या खबरदारीवर चर्चा करण्यात आली. एखाद्या विशिष्ट समाजाच्या संदर्भात भूमिका घेतल्यास अन्य समाजावर, धार्मिक उत्सवावर काय परिणाम होणार, याबद्दल आजच्या बैठकीत चर्चा झाली. खेडेगावात जवळपास रोजच भजन-कीर्तन, विविध कार्यक्रम सुरू असतात. नवरात्रौत्सव, गणेशोत्सव, गावाकडील यात्रा यावर काय काय परिणाम होतील यावर चर्चा करण्यात आली. कायदा सर्वांसाठी समान आहे. त्यामुळे वेगवेगळ्या लोकांसाठी वेगळी घेता येणार नाही. सर्वांसाठी एकच भूमिका असेल असे, असे गृहमंत्री वळसे पाटील यांनी स्पष्ट केले.

'...त्यांनीच याचा विचार करावा' : सर्वोच्च न्यायालयाने ध्वनीप्रदूषण यासंदर्भात २००५ मध्ये निर्णय दिला. अन्य काही न्यायालयानेही काही महत्त्वाचे निर्देश दिलेत. महाराष्ट्र सरकारने २०१५ ते २०१७ या कालावधीत काही परिपत्रक काढले आहेत. त्यामध्ये भोंग्यांचा वापर, त्यासाठी लागणारी परवानगी, अटी, शर्ती, वेळ आणि आवाजाची मर्यादा स्पष्ट केल्या आहेत. राज्यात त्याच आधारे आजपर्यंत कायद्याचा वापर होतो आहे. परंतु, गेल्या काही दिवसांपासून भोंग्यांबाबत इशारे देण्यात येत आहेत. मात्र भोंग्यांसंदर्भात निर्णय घेण्याचे अधिकार सरकार नाहीत. ज्यांनी भोंगे लावले आहेत, वापर करत आहेत, त्यांनीच याचा विचार करावा, असे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी स्पष्ट केले. 'राष्ट्रीय पातळीवर निर्णय घ्यावा' : सर्वोच्च न्यायालयाने भोंग्यांबाबत दिलेला निर्णय सर्व देशाला लागू होतो. केंद्र सरकारने यामुळे राष्ट्रीय पातळीवर निर्णय घ्यावा. जेणेकरून राज्यांमध्ये वेगळी परिस्थिती निर्माण होणार नाही. आवश्यकता भासल्यास सर्वपक्षीय शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्र्यांची भेट घेऊन मार्ग काढू या, असे बैठकीत शिक्कामोर्तब केले जाईल. तसेच राज्य सरकार अनेक परिपत्रक काढले आहेत. त्याच्या आधारे, आपण निर्णय घेत आहोत. पोलीस विभागातील अधिकाऱ्यांशी याबाबत बोलणार असून गाईडलाईन्स नव्याने बनवण्याची आवश्यकता आहे का, हे ठरवावे लागेल, असे गृहमंत्री वळसे पाटील म्हणाले.

पोलीस
बातमी पत्र
पोलीस बातमी पत्र
मुंबई
★ मुंबई, मंगळवार २६ एप्रिल ते ०२ मे - २०२२


# चाकूचा धाक दाखवून नौदल अधिकाऱ्याचा मोबाईल पळवला, मुंबई पोलिसांकडून दोघांना अटक



नौदल अधिकाऱ्याला चाकूचा धाक दाखवून त्यांचा मोबाइल फोन हिसकावून घेतल्याप्रकरणी दक्षिण मुंबईतील एमआरए मार्ग पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने आरोपींचा शोध घेतल्यानंतर हे दोघे हाती लागले. वसीम शेख उर्फ तिरची टोपी ( वय, 32 ) आणि अमीन खान उर्फ टायगर ( 25 ) अशी अटक करण्यात आलेल्या दोन्ही संशयित आरोपींची नावे आहेत. सुमित संजय कुमार ( 24) यांनी या प्रकरणी तक्रार दिली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुमित कुमार हे लॉग एक खलाशी आणि आयएनएस चेन्नई डिस्ट्रॉयर जहाजातील नौदलाचे अधिकारी आहेत. 17 एप्रिल रोजी ते कर्नाक बंदरहून मुसाफिर खानाकडे जात असताना दोन जणांनी त्यांना चाकूचा धाक दाखवत त्यांच्याकडील मोबाईल पळवून नेला. यावेळी कुमार यांच्या उजव्या हाताला दुखापत झाली झाली आहे. या प्रकरणी कुमार यांनी तक्रार दिल्यानंतर एमआरए मार्ग पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम 394 आणि 34 अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने एपीआय नीलेश साळुंके, पीएसआय दिनेश पाटील आणि स्वप्नील शिंदे यांच्या पथकाने टोपी आणि टायगर या दोघांना अकट केली. अटक केलेले दोघेही व्यसनी असल्याचा संशय असून त्यांनी व्यसनासाठीच हा गुन्हा केल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकणी अद्याप संशयितांकडील फोन जप्त केला नाही. फोन जप्त करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. पोलीस या दोघांकडेही कसून चौकशी करत आहेत. या दोघांनी या पूर्वी अजून कोठे असे गुन्हे केले आहेत का? शिवाय त्यांच्या टोळीत हे दोघे जणच आहेत की, अजून कोणाचा समावेश आहे याबाबत पोलीस चौकशी करत आहेत.

# एमआयडीसीमधील मॅट्रिक्स प्रा.लि.मध्ये भीषण आग; कोट्यावधींचे नुकसान



औरंगाबाद - पैठण एमआयडीसीमधील मॅट्रिक्स प्रा. लि. कंपनीतील वेअर हाऊसला रविवारी (काल) रात्री लागलेल्या भीषण आगीत कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीचे कारण अस्पष्ट असून सुदैवाने कुठलीही जीवित हानी झाली नाही. आग इतकी मोठी होती की, धुराचे लोळ खूप दूरपर्यंत पसरले होते. दरम्यान, ही आग विझविण्यासाठी चार अग्निशमन दलांचे बंब आणि दहा पाणी टँकरचा वापर करण्यात आला. जवळपास तीन ते चार तासांनंतर ही आग आटोक्यात आणण्यात या यंत्रणेला यश आले आहे.

मॅट्रिक्स कंपनी या कंपनीत औषधी गोळ्याकरीता लागणाऱ्या व्हिटामिन-एचे मटेरियलचे उत्पादन होते. उत्पादित झालेले हे मटेरिअल साठविण्यासाठी कंपनीत वेअरहाऊस बांधण्यात आलेले आहे. कंपनी चालू असताना रविवारी सायंकाळी भीषण आग लागली. या आगीत कोट्यावधींचे नुकसान झाले आहे. आग लागताच कामगारांना बाहेर काढण्यात आल्याने जीवितहानी टळली.

# चोरीच्या संशयावरून वॉचमनचा खून; 7 आरोपींना पोलीस कोठडी



औरंगाबाद - शताब्दी नगर येथील मेघावाले सभागृहातील फोकस चोरी केल्याच्या संशयावरून सभागृहाच्या वॉचमनला सात ते आठ जणांनी हात पाय बांधून दांड्याने मारहाण करत निर्घृण हत्या केली होती. दरम्यान गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सात आरोपींना तात्काळ अटक केली. आरोपींना 26 एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. काय होती घटना? - पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनोज शेषराव आव्हाड (वय २७ रा. मेघवाल सभागृह एन १२ हडको) असे मृत तरुणाचे नाव आहे. मनोज हा मेघावाले सभागृहात काम करत होता. एक महिन्यापूर्वी मनोज याची पत्नी माहेरी गेली असल्याने तो सभागृहात राहत होता. दरम्यान बुधवार २० एप्रिल रोजी खरात यांची मुले घरी येऊन मनोज याला कामासाठी घेऊन गेले. मनोजच्या लहान भावाच्या मोबाईलवर मनोजला मारहाण करत असल्याचा व्हिडिओ आला. यावेळी मनोजची आई आणि भाऊ तात्काळ त्याला पाहण्यासाठी त्याच्या कामाच्या ठिकाणी असता तो तेथे आढळून आला नाही. त्याला घाटी रुग्णालयात मारहाण केलेल्या तरुणांनी नेले होते. घाटी रुग्णालयातील डॉक्टरांनी मनोजला तपासून मृत घोषित केले होते. दरम्यान, मारहाण करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध मनोजच्या आईच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे - सागर गणपत खरात, सनी गणपत खरात, सतीश भास्कर खरे, आनंद लक्ष्मण गायकवाड, आनंद भाऊसाहेब सोळसे, अष्टपाल रमेश गवळी, शिवम नरेंद्र तुपे सर्व राहणार टीव्ही सेंटर परिसर, अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

आरोपींना 26 एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी - मनोज आव्हाड याला मारहाण करताना त्याच्या रक्ताने माखलेले कपडे त्यासोबतच आरोपींनी गुन्ह्यात वापरलेले कपडे व साहित्य जप्त करण्यासाठी पोलीस कोठडी देण्याची विनंती सरकारी वकील जरीन दुर्राणी यांच्या वतीने करण्यात आली. यावेळी आरोपींच्या वकिलांनी देखील पोलीस कोठडी देऊ नये याकरिता युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने सात आरोपींना 26 एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

# चंद्रावर जमीन घेणाऱ्या विकासकासह तिघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल




ठाणे - चंद्रावर जमीन घेणाऱ्या उल्हासनगरमधील एका बांधकाम व्यवसायिकासह तिघांनी उल्हासनगर मधील ७७० चौ. फुटाच्या जमिनीचे बनावट कागदपत्र तयार करून परस्पर विक्री केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

भरत रोहरा, अजीज शेख व राम वाधवा असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तींची नावे आहे. तक्रारदार परमानंद माखिजा यांची मालकीची ७७० चौ. फुटाची जमीन उल्हासनगर शहरातील कॅम्प नंबर ४ मधील ओटी सेक्शन परिसरात आहे. याच जमिनीची १५ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२२ दरम्यान भरत रोहरा, अजीज शेख व राम वाधवा यांनी आपसात संगनमत करून या जमिनीचे बनावट कागदपत्र तयार केली. त्यानंतर ही जमीन परस्पर राजेश तलरेजा यांना विक्री केली. विशेष म्हणजे विक्रीचा व्यवहार करताना २०१९ साली ५० हजार रुपयांचे टोकण घेऊन फसवणूक केल्याचे जमिनीचे मालक परमानंद माखिजा यांनी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे.

राजकीय हेतूने गुन्हा दाखल - विशेष म्हणजे गुन्हा दाखल होण्यापूर्वी बांधकाम व्यावसायिक राम वाधवा यांनी २०२० साली चंद्रावर जमीन घेण्यासाठी जयपूरच्या एका कंपनीशी संपर्क केला होता. त्यानंतर राम वाधवा यांनी एक महिनाभर आधी कागदोपत्रांची पूर्तता केल्यावर त्यांच्या हाती चंद्रावर जमीन खरेदीची पावती मिळाली होती. चंद्रावरील जमीन ४३ हजार ५०० स्केअर फिट अर्थात एक एकर आहे. तसेच जंगलात, समुद्रात, अवकाशात रीचेबल असलेल्या सॅटेलाईट फोनदेखील त्यांनी त्यावेळी बीएसएनएल कडून घेतला होता. एकंदरीत एवढे सगळे असताना केवळ ७७० चौ. फुटाच्या जमिनीच्या फसवणूक प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल झाल्याने शहरात चर्चेचा विषय ठरला आहे. या बाबत बांधकाम विकासक राम वाधवा यांच्याशी संपर्क साधला असता हा गुन्हा राजकीय हेतूने आपल्यावर दाखल केल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# शिवीगाळ केल्याच्या कारणातून पुण्यात एकाची गळा चिरून हत्या




पुणे - शिवीगाळ केल्याचा राग मनात धरून एका 65 वर्षीय व्यक्तीची गळा चिरून हत्या केल्याची धक्कादायक घटना पुण्यातील नऱ्हेमधील व्यसनमुक्ती केंद्रात घडली आहे. शिवीगाळ केल्यानंतर राग अनावर झाला आणि म्हणून व्यसनमुक्ती केंद्रात गुरुवारी पहाटे एकाने त्याच्या सहकाऱ्याचा काचेने गळा चिरून हत्या केली.

हा खून इतका निर्घृण होता की, आरोपीने काचने गळा कापल्यानंतर देखील मृत व्यक्तीच्या घशात बोटे घालून त्याचा गळा फाडत आरोपीने त्याची भंयकर वृत्ती दाखवून दिली. या घटनेत हत्या झालेल्या व्यक्तीचे नाव अरुण मोहन राठी असून आरोपी संकेत सुनिल आल्हाट (वय 24) याला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणी एका महिलेने फिर्याद दिली होती.गुरुवारी रात्री अरुण राठी हे गाढ झोपेत असताना आल्हाटने साडेतीनच्या सुमारास राठी ज्या ठिकाणी झोपले होते तिथे जात त्यांच्या तोंडावर टॉवेल ठेवला. त्याचदरम्यान काचेच्या तुकड्याने आव्हाडने राठी यांचा गळा चिरला. काय आहे प्रकरण? - याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नऱ्हेच्या व्यसनमुक्ती केंद्रात गुरुवारी मध्यरात्री हा सगळा प्रकार घडला आहे. पुण्यातील या व्यसनमुक्ती केंद्रात सुमारे 45 वक्तींवर उपचार सुरू होते. 16 एप्रिलला आरोपी सुनील आल्हाट याचा वाढदिवस होता व त्यास भेटायला कोणी न आल्याने तो तणावात होता. तसेच मृत व्यक्तीने त्याला शिवीगाळ केली होती. याचाच राग धरून त्याने राठीची हत्या केली.

# अकरा वर्षीय मुलावर अनैसर्गिक अत्याचार, नराधमास वीस वर्ष सक्तमजुरीची शिक्षा



सांगली - एका अल्पवयीन अकरा वर्षीय मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्या प्रकरणी एका तरुणास 20 वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. जाफर उर्फ जमाल नदाफ असे या नराधमाचे नाव आहे. सांगली जिल्हा सत्र न्यायालयाने ही सुनावली ठोठावली आहे. सांगली शहरामध्ये 2019 मध्ये हा धक्कादायक प्रकार घडला होता. अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार - सांगली शहरा मध्ये एका अकरा वर्षीय अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली होती. एका 19 वर्षीय तरुणाकडून हा घृणास्पद प्रकार करण्यात आला होता. 29 डिसेंबर 2019 रोजी अल्पवयीन मुलगा हा सायकलवरून प्रोजेक्टची बॅटरी आणण्यासाठी चांदणी चौककडे निघाला होता. यावेळी रस्त्यामध्ये थांबलेल्या जाफर उर्फ जमाल नदाफ याने अल्पवयीन मुलास थांबवत, आपला मोबाईल शाळेच्या आवारात पडल्याचं सांगितले व मोबाईल शोधण्यासाठी मदत करण्याची विनंती केली. त्यानंतर सुट्टीमुळे निर्जन असलेल्या कर्मवीर भाऊराव विद्यामंदिर,शाळा क्रमांक 43 च्या आवारात अल्पवयीन मुलगा आणि नराधम जमाल पोहोचले. त्यानंतर जमाल याने अल्पवयीन मुलाला शौचालयामध्ये नेऊन जीवे मारण्याची धमकी देत, त्याला अंगावरचे कपडे काढायला सांगत अनैसर्गिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता.

20 वर्ष सक्त मजुरीची शिक्षा - या घटनेची पीडित मुलाने घरी आल्यावर सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यामध्ये जफार उर्फ जमाल नदाफ याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याचा खटला सांगली न्यायालयमध्ये सुरू होता. गुरुवारी या खटल्याची अंतीम सुनावणी पार पडली. ज्यामध्ये पीडित मुलगा आणि वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्ष ग्राह्य मानून न्यायालयाने जमीर उर्फ जमाल नदाफ याला 20 वर्षे सक्तमजुरी व 10 हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. त्याच बरोबर दंड न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे.या खटल्या मध्ये सरकारी वकील म्हणून रियाज मुजावर यांनी काम पाहिले.

# कौटुंबिक वादातून जावयाने केला सासऱ्याचा खून, आरोपी चाकू घेऊन पोहोचला पोलीस ठाण्यात

**पुण्यात कौटुंबिक वादातून जावयाने सासऱ्याचा चाकूने वार करत खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातील खडकी बाजार परिसरात काल ही घटना घडली असून रमेश उत्तरकर असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर आरोपी अशोक कुडले हा त्यांचा जवाईच आहे. या घटनेनंतर आरोपी अशोक कुडले स्वतः हातात चाकू घेत खडकी पोलिस स्टेशनमध्ये दाखल झाला. आणि खून केलेली कबुली देखील दिली.**



पुणे - कौटुंबिक वादातून जावयाने सासऱ्याचा चाकूने वार करत खून केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातील खडकी बाजार परिसरात काल ही घटना घडली असून रमेश उत्तरकर असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर आरोपी अशोक कुडले हा त्यांचा जवाईच आहे. या घटनेनंतर आरोपी अशोक कुडले स्वतः हातात चाकू घेत खडकी पोलिस स्टेशनमध्ये दाखल झाला. आणि खून केलेली कबुली देखील दिली.काय आहे प्रकरण - याप्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अशोक कुडले रमेश उत्तरकर यांचा जावई आहे. 2019 पासून आरोपी अशोक आणि त्याच्या पत्नीत वाद होते. त्यामुळे ते दोघे वेगळे राहायचे. त्याची पत्नीही गेल्या तीन वर्षापासून वडिलांकडे राहायला आहे. या दोघांना एक मुलगा आणि एक मुलगी अशी दोन मुले आहेत. सासऱ्यावर केले चाकुने वार - दरम्यान या दोन कुटुंबातील वाद हा न्यायप्रविष्ट आहे. अशोक कुडले हा आपल्या पत्नीला नांदायला परत पाठवा अशी मागणी सतत आपल्या सासऱ्याकडे करत होता. तर उत्तरकर हे घटस्पोट देण्याबाबत ठाम होते. याच प्रकरणी काल न्यायालयात तारीख होती. या दरम्यानच या दोघांमध्ये काल दुपारी वाद झाला. हाच वादाचा राग डोक्यात ठेवून संध्याकाळी अशोक हा उत्तरकर यांच्या दुकानी गेला. उत्तरकर हे सायंकाळी दुकानात बसले असता अशोक कुडले याने त्यांच्या दुकानात जाऊन चाकूने जोरदार वार केले. आणि उत्तरकर यांचा जागेवरच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी अशोक कुडले स्वतः हातात चाकू घेत खडकी पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला. आणि खून केलेली कबुली देखील दिली.

# नाशकात रस्त्याने जाणाऱ्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग; पोलिसांनी दोघांना घेतले ताब्यात




नाशिक - मैत्रिणीसोबत रस्त्याने पायी चाललेल्या अल्पवयीन मुलीचा तिघा संशयितांनी विनयभंग केल्याची घटना म्हसरूळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीनुसार म्हसरूळ पोलीस ठाण्यात तिघा संशयितांवर ( case has been registered against three suspects ) विनयभंग आणि पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी दोघा संशयितांना ताब्यात घेतले आहे. एकजण अद्याप फरार असून, त्यालाही लवकरच ताब्यात घेतले जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

म्हसरूळ परिसरातून मंगळवारी सायंकाळच्या सुमारास पीडित मुलगी मैत्रिणीसोबत पायी चालली होती. त्यावेळी अचानक पीडितेच्या भावाच्या ओळखीचा एक जण त्याच्या अन्य दोन मित्रांसोबत तेथे आला व पीडितेला थांबवले. ओठांना एवढी लिपस्टिक का लावतेस, असे म्हणून त्याने व अन्य एकाने पीडितेचे दोन्ही हात पकडले. त्यामुळे संतापलेल्या पीडितेने दोघांचे हात झटकून स्वत:ला सोडवले. पीडितेने थेट म्हसरूळ पोलीस ठाणे गाठत घडलेला प्रकार पोलिसांना सांगितले. त्यानुसार पोलिसांनी तक्रार नोंदवत तिघा संशयितांवर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी काही तासांतच तिघांपैकी दोघा संशयितांना ताब्यात घेतले आहे. पुढील तपास सुरु आहे.

### सख्ख्या भावांचं अपहरण,

असून अंबरनाथ पोलिसांकडून मुलांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. पश्चिमेच्या भेंडीपाडा भागात राहणारे आठ वर्षीय रमजान आणि 11 वर्षीय सिराज अली या दोघांचे अपहरण झाले आहे. याबाबत त्यांच्या पालकांनी अंबरनाथ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. एक महिन्या पूर्वी रमजान आणि सिराज हे भाऊ घरातून निघून गेले. या दोघांना पंक्चर काढण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सोल्युशनची नशा जडली होती. शिवाय या आधी देखील दोघे घर सोडून गेले होते. मात्र, आता त्यांच्या आईच्या तक्रारीवरून अंबरनाथ पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. सध्या मुंबई, उपनगर आणि आजूबाजुच्या परिसरात पोलिसांकडून या भावांचा शोध सुरू आहे, अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीरंग गोसावी यांनी दिली आहे. दरम्यान, हे दोघे भाऊ घरातून निघून गेले आहेत की, त्यांचं अपहरण झालं आहे, याबाबत पोलीस अधिक तपास करत आहेत. आपल्या मुलांचा लवकरात-लवकर शोध घेण्यात यावा अशी मागणी तक्रार दाखल करणाऱ्या या मुलांच्या आईने पोलिसांकडे केली आहे. या मुलांच्या आईने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी दोघांचाही शोध सुरू केला आहे.

# पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार २६ एप्रिल ते ०२ मे - २०२२




संपादकीय...



## वास्तवाकडे पाठ फिरवणे एवढेच त्याचे राजकारण झालेले आहे

मराठी साहित्य महामंडळउदगीरच्या संमेलनात भारत सासणे यांनी अध्यक्षीय भाषणात घेतलेल्या भूमिकेमुळे पुन्हा एकदा एकट, दुकट मराठी लेखक सोडला, तर बहुतांश मराठी लेखक भूमिका का घेत नाहीत, हा प्रश्न पुनः समोर आणला गेला आहे. जे घेतात ते संमेलनाच्या व्यासपीठावर अध्यक्ष नसताना एरवी त्या भूमिकांचे काय करतात? अशा भूमिका बाळगू इच्छिणाऱ्या लेखकांच्या - प्रगतशील लेखक संघटनेचा अपवाद वगळता - संघटना का असत नाहीत? साहित्य संस्था मुळात लेखकांच्याच होत्या. पण, त्यांनी ते त्यांचे कामच नाही, अशी सरंजामी भूमिका बाळगत हातच्या घालवल्या. मुळात या त्यांच्याच संस्था त्यांना स्वतःच चालवाव्यात, असे का वाटत नाही? या संस्था आणि त्यांची संमेलने ज्या थोर महाभागांना रिकामटेकडेपणाचे उद्योग वाटतात ते तिथले रिकामटेकडे घालवून, कार्यप्रवण लोक



आणण्यासाठी काहीच का करत नाहीत? देशातील कोणत्याही समाजघटकांवरील अन्याय अथवा मानवाधिकार हननाच्या प्रसंगी एकेकाळी किमान निषेधासाठी तरी आमच्या पिढीतले लेखक तातडीने गोळा होत असू. तेवढेही आज लेखक करतांना का दिसत नाहीत? सत्ताकारण, वर्चस्वकारण, फक्त काहींसाठीच अमर्याद संपत्ती संचयकारणाचेच अर्थकारण, यांनीच तेवढा आजचा अवकाश व्याप्त आहे. त्याविरोधात, वंचितांच्या बाजूने लिहिणारा, बोलणारा जो त्या प्रत्येकाला विकासविरोधी, राष्ट्रविरोधी ठरवण्यापर्यंत सत्तेची मजल गेली आहे; त्याविरुद्ध मराठी लेखक संघटित भूमिका घेऊन उभे झाल्याची, केवळ प्रगतशील लेखक संघ वगळता किती उदाहरणे आहेत? माणसाचा श्वासोच्छवासदेखील नियंत्रित करून, बसल्या जागी त्याला प्रतिकार, प्रतिरोधविहीन करून गुदमरवून टाकणारे आजचे राजकीय वातावरण मराठी लेखकाला अस्वस्थ करत नाही. आपणही संवादाचे एक प्रभावी माध्यम एकेकाळी होतो, याचेही त्याला भान आणि समज दोन्ही नाही. समकालीन राजकीय वास्तवाचे कोणतेही समर्थ आणि सक्षम पडसाद, एखाद दुसऱ्या कवीचा, तोही क्षीण अपवादवगळता मराठी कथा, कादंबऱ्यांच्या, नाटकांच्या पातळीवर समर्थपणे दिसत नाही. समकालीन जीवनभानाची उपस्थितीच तिथे नाही. उद्या या काळाचा असा वाङ्मय इतिहास बघून या काळात असे काही घडले असेल, याचा या कलात्मक पातळीवर मागमूसही आढळणार नाही, अशी कडेलोटाची अवस्था आहे. व्यवस्थाविरोध, समाजसुधारणेच्या कित्येक लढ्यांचे विवेकी नेतृत्वच एकेकाळी मराठी साहित्यिक-कलावंतांनी केले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी तोच आघाडीवर होता. दलित, ग्रामीण, आदिवासी, जन असे सामाजिक, राजकीय भानाचे साहित्य प्रवाह मराठी लेखकानेच दिले. आणीबाणीच्या विरोधाचे राजकारण असो वा नामांतराचे आंदोलन असो वा शेतकरी संघटनेचे, स्त्रीमुक्तीचे असो, अंधश्रद्धा निर्मूलनाचे किंवा कोणत्याही समाजघटकांच्या शोषणाविरुद्धचे लढे हे सारे राजकीय भान असलेल्यांनीच उभारले, हाताळले. हे सारे त्याच्या जीवनाचा अपरिहार्य भागच होते.मात्र, या साऱ्याला कलात्मक, सृजनाच्या पातळीवर शब्द दिला तो मोठ्या प्रमाणावर केवळ मराठी कवितेनेच. वैचारिक गद्यानेच. मात्र, २,५०० वर्षांच्या अभिजात दर्जा हवा असणाऱ्या मराठी भाषेजवळ एकही नाव घेण्याजोगी ताजी राजकीय कादंबरी, नाटक नाही हे वास्तव आहे. आपण राजकीय संवेदन बाळगण्याचा विचार जरी केला तरी आपली चैन, सुरक्षा, लाभ, स्वार्थ यांना धक्का बसेल. त्यामुळे विचारच करायचा नाही, असा धोरणात्मक निर्णय जणू मराठी लेखकाने घेतलेला आहे.परिणामी कोणत्याही लहान मोठ्या संस्थांमधील निर्णय घेणाऱ्या सत्तास्थानांपासून तो सर्वोच्च राजकीय सत्तास्थानापर्यंतच्या कोणत्याही पातळीवरील अतिसामान्यदेखील राजकारणी दुखावला जाईल, अशी कोणतीच कृती करायला तो तयार नाही.निर्भय, निर्भीड, सडेतोड हे शब्दच त्यासाठी त्याने आपल्या शब्दकोषातून काढून टाकले आहेत. उलट शक्य तेवढे त्यांचे स्तुतिपाठक होण्याचीच मिळाली तर त्याने संधी घेतली आहे. अशा लेखकांचे हे राजकारण हीच त्यांची तथाकथित राजकीय अलिप्तता. ही त्याची आवडती 'अराजकीय' अशी भूमिकाच आहे. आपण विचार जरी केला तरी 'बिघडून' जाऊ आणि चुकून आपण लिहिलेच तर आपली सुरक्षा, लाभ, सन्मान, शासकीय समित्या, पुरस्कार हे सारे गमावून बसू, या भयगंडाने तो पछाडलेला आहे. वास्तवाकडे पाठ फिरवणे एवढेच त्याचे राजकारण झालेले आहे. त्यामुळे तो भूमिकाच घेत नाही. गजानन माधव मुक्तिबोधांच्या भाषेत त्याला एवढेच विचारणे क्रमप्राप्त आहे, 'पार्टनर, तुम्हारा पालिटिक्स क्या है?

# लाभार्थी मतदार होतात तेव्हा..!

'उज्ज्वला' गॅसची टाकी आता पडून असते कोपऱ्यात, समृद्ध अडगळीसारखी. २०१६ मध्ये योजना सुरू झाली होती तेव्हा ती देताना केला जाणारा प्रचार कमालीचा भावनिक होता.. 'चुलीच्या धुरामुळे एका वेळी ४० सिगरेटचा धूर 'मायमाऊली' शरीरात भरून घेते, अशाने कशी जगणार ती?' असा भावनिक प्रश्न पंचतारांकित हॉटेलमध्ये उज्ज्वला गॅसची टाकी देण्याच्या शुभारंभी भाजपचे नेते विचारत होते. तेव्हा काँग्रेस पक्षाला बाईचं मन कळत नाही, असा समज व्हायचा. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गरिबांचा कळवळा आहे हो,' असं कोणी तरी आवर्जून सांगायचं, विश्वास बसायचा लगेच लोकांचा. सबसिडीची रक्कम सोडून देणे त्या वेळी ही कृती देशभक्तीची मानली जायची. उज्ज्वला योजना सुरू झाली तेव्हा देशातील गॅसजोडणीचा दर होता ६२ टक्के, तो आता आहे ९९.८ टक्के एवढा. ३१ जानेवारी २०२२ पर्यंत नऊ कोटी जणांना गॅसजोडणी देण्यात आलेली आहे. पण २०१६ ते २०२२ या सहा वर्षांत बदलाचा झपाटा फार होता. गणिते झपाट्याने बदलत गेली. उज्ज्वला योजना सुरू झाली तेव्हा ५६० रुपये दर होता. यामध्ये सबसिडीपोटी मिळणारी रक्कम होती १०९.३९ रुपये. मार्च २०१७ पर्यंत मग दर ७८४ रुपयांवर गेले तेव्हा परत येणारी रक्कम होती ३०५ रुपये. म्हणजे सरासरी ४८० रुपयांना गॅसची टाकी मिळत असे. जुलै २०१७ रोजी गॅस टाकीवर पाच टक्के वस्तू व सेवा कर लावण्यात आला. काही दिवस दर स्थिर राहिले. मे २०२० मध्ये सबसिडी आलीच नाही. पुढे दोन महिने एक रुपया ७६ पैसे आणि आता ती एकदम घसघशीत म्हणजे ३.२६ रुपयांवर स्थिर झाली आहे. ऑगस्ट २०२१ नंतर गॅसच्या टाकीत महिना-दोन महिन्याला २५ रुपयांची वाढ होत गेली. गॅसच्या टाकीचा आताचा दर आहे ९५८ रुपये ५० पैसे. ही सारी डिजिटल वाढ-व्यवहार गावातील कोणत्याही महिलेस कळण्याची शक्यता तशी कमीच. परिणामी बहुतेकींनी आपली गॅसची टाकी अडगळीत टाकून दिली. 'गरिबांचा कळवळा आहे हो' असं सांगणारे भाजपचे ते नेते आता उज्ज्वला योजनेचे नावही काढत नाहीत. आता त्यांच्या मांडणीचे सूत्र बदलले. 'नवी योजना, नवे लाभार्थी'.

छोटय़ा शहरातील वस्त्या हे आता लाभार्थी बनविण्याचे प्रमुख केंद्रे आहेत. औरंगाबाद, बीड, अमरावती असं कोणतंही शहर घ्या. तेथे वस्त्या वाढताहेत. बीड शहरातील एका वाढत्या वस्तीवरील अनेक जण बांधकाम मजूर म्हणून काम करणारे. त्यांच्या बायकांना वेगाने प्रगती करण्याची प्रचंड इच्छा. एकटय़ा नवऱ्याच्या मेहनतीने संसार चालणार नाही, याची त्यांची जाणीव तशी जुनीच. पण काय काम करायचे हे त्यांना माहीत नव्हते. दीनदयाळ कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमातून त्यांना शिलाई मशीन देण्यात आली. त्यांना पिशवी शिवण्याचे प्रशिक्षण दिले जाते. या वस्तीमधील महिलांनी बचत गट बांधलेले. थोडी बचत करून पत वाढवता येते हे त्यांना कळालेले. तसं खूप श्रीमंत होण्याचं स्वप्न आहे असं नाही, पण पुढं पाऊल टाकायचं आहे. ही आशा- आकांक्षा शहरांमधील वस्त्यांमध्ये खूप अधिक. शहरी जीवन पाहणाऱ्या, त्यातील सुखसुविधा मिळविण्यासाठी आसुसलेल्या व्यक्ती आता नव्या योजनेमध्ये लाभार्थी यादीत आहेत. पण कौशल्याच्या या योजना पोहोचविणारे फक्त सरकारी कर्मचारी नाहीत, त्यांच्यासमवेत सारा भाजपचा परिवारही असतो. लाभार्थी मतदार व्हावा असे प्रयत्न इथून सुरू होतात. या वस्त्यांमध्ये कोण दीनदयाळ उपाध्याय, त्यांची वैचारिक भूमिका काय होती, ते उजवे की टोकदार उजवे असले प्रश्न विचारले जात नाहीत. किंबहुना या प्रश्नांना जगण्याच्या रहाटगाडग्यात थारा मिळण्याची शक्यताच नाही. अशा छोटय़ा शहरांमधील वस्त्यांमधून २५ हजार महिलांपर्यंत योजनांच्या माध्यमातून संपर्क केला जात आहे. लाभ घेणाऱ्या महिलांपर्यंत कौशल्याचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे नाव काहीही असो, चेहरा पंतप्रधानांचा असतो. पण आता यात गैर काय? गरीब कल्याणाच्या योजना सरकारला धर्मार्थ कराव्या लागतात हे तत्त्व मुळात होतंच. पूर्वी इंदिरा गांधी, संजय गांधी यांच्या नावाच्या योजना होत्याच. पण सारे लाभार्थी मतदार झालेच पाहिजेत असा आग्रह किंवा अट्टहासाचे प्रयत्न अलीकडचेच. लाभ कोणत्याही स्वरूपाचा होवो त्याचे श्रेय सर्वोच्च व्यक्तीला देण्याची कार्यपद्धतीही आता सरकारी यंत्रणांमध्ये रूढ करण्यात आली आहे. ज्या योजनेच्या अपयशातून टीका होईल असे वाटते, तेव्हा त्याचे उल्लेख टाळायचे, असा प्रचार चर्चेच्या स्वरूपात.



लाभार्थी मतदार झाला पाहिजे हे प्रचारतंत्र रशिया-युक्रेन युद्धादरम्यान विद्यार्थ्यांना मायदेशी परत आणताना अनेकांच्या लक्षात आले. विमान रात्री- बेरात्री कधीही पोहोचो, त्याच्या स्वागताला केंद्रीय मंत्रिमंडळातील एक सदस्य आवर्जून जात असे. पहाटे ३ वाजतासुद्धा आपला जयजयकार व्हावा असा आग्रह आणि अट्टहास हा भाजप प्रचारतंत्राचा भाग आहे. सरकार म्हणून जनतेच्या कल्याणार्थ केलेली वर्तणूक ही उपकारार्थ आहे, अशी मनोभूमिका घडविण्यात भाजप प्रचाराला यश मिळताना दिसत आहे. माध्यमांमध्ये दिसणारे आणि योजनांच्या पातळीवर सुरू असणारे प्रयत्न लाभार्थीला मतदार बनविणारे आहेत.

स्वस्त धान्य दुकानात मिळणारे धान्य ही मोदीजींची कृपा आहे, हे पसरवण्यात आलेल्या प्रचारतंत्रातून उत्तर प्रदेश निवडणुकीत 'नमक का कर्ज अदा करो' असा संदेश पसरत गेला. अंत्योदय योजनेत ३५ किलो धान्य, पंतप्रधान गरीब कल्याण योजनेतून प्रत्येकाला मिळणारे पाच किलो धान्य, या योजनेस सप्टेंबरपर्यंत नव्याने दिलेली मुदतवाढ ही बाब प्रशासकीय पातळीवर अगदीच किरकोळ वाटत असली तरी त्यात लाभार्थी अधिक असतात आणि त्यात उपकाराची भावना अधिक निर्माण करता येते, याची जाणीव भाजप प्रचारतंत्राचा मुख्य भाग आहे. लाभार्थी वाढायला हवेत यासाठी रा. स्व. संघ परिवारातील सेवाकार्य करणारे अनेक कार्यकर्ते जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असतात.

बँकेतून कर्ज मिळण्याचा निकष पत किंवा कौशल्य एवढाच राहिलेला नाही. त्यात सरकारची उपकारार्थ भावना अधिक आहे. 'मुद्रा' हे त्याचे उत्तम उदाहरण. राज्यसभेत मुद्रा योजनेतील तपशील अलीकडेच जाहीर झाले असून त्यानुसार २५ फेब्रुवारीनुसार ३३.८६ कोटी कर्जदारांना १७.६७ लाख कोटी कर्जवाटप झाले. या कर्ज प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी जिल्हास्तरीय समित्याही गठित करण्यात आल्या होत्या. त्यात अनेक घोळ होते. पण करोनाकाळात कर्ज योजनेला मागणी होती. ती स्वाभाविकही होती. अशी कोटय़वधी जण जोडले असणारी योजना आहे जनधन. ४४ कोटी ७६ खात्यांमध्ये पैसे नसले तरी पाच हजार रुपयांपर्यंतची उचल घेण्याची मुभा या योजनेत आता देण्यात आली आहे. या सगळ्या प्रक्रियेत बँकांनी केलेली कर्जमंजुरी हा केवळ उपचाराचा भाग आहे. कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी सरकारचा दृष्टिकोन अधिक महत्त्वाचा आहे, हे ठसविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक घडवून आणला जातो. हे घडत असताना मुद्रा योजनेची थकबाकी २० टक्क्यांवर गेली आहे. योजनेमुळे बँकांचे नुकसान झाले तरी बेहत्तर, पण लाभार्थीची व्याप्ती वाढली पाहिजे, हा आग्रह लाभार्थी मतदार करण्याचा भाग असतो आणि आहे.घरकुल योजनेतील लाभार्थी हा मतदार बनतोच बनतो. हा अनुभव अगदी काँग्रेस कालखंडापासून नेत्यांना होता. पण श्रेयनामावलीतील फरक हा अधिक महत्त्वपूर्ण असतो. पूर्वी घरकुल मंजूर करणाऱ्या पक्षातील नेत्याशी निष्ठा असणारे मतदार तयार होत. पण त्या निष्ठा त्या- त्या गावातील सरपंच किंवा जिल्हा परिषद सदस्यापर्यंत राहतील अशी राजकीय बांधणी काँग्रेसच्या कालखंडात होती. आता भाजपच्या कार्यशैलीत श्रेय हे फक्त सर्वोच्च नेत्याचे.

वेगवेगळय़ा शासकीय योजनांसाठी बँकांकडून दिले जाणारे कर्ज हा सरकारप्रति सहृदयता वाढविण्यास कारणीभूत व्हावी या रचनेचे आता पुढचे प्रचार पाऊल पडते आहे. आता लाभार्थी केवळ मतदारच नाही तर प्रचारकही झाले आहेत. स्टार्टअपमधील आकडेवारीकडे आता या नजरेने पाहण्याची आवश्यकता आहे. बँका आता सरकारप्रति चांगुलपणा वाढविण्याच्या कामातील 'टूल' म्हणून वापरण्यात येत आहेत. पूर्वीही अशा योजना होत्या. पण त्याच्या अंमलबजावणीकडे फारसे कोणाचे लक्ष नसायचे. आता सगळी भाजप परिवाराची यंत्रणा कर्ज प्रकरणातील उपकारार्थ जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत असते.

एका बाजूला हे सारे प्रयत्न आणि दुसरीकडे गाय, भोंगे, हिजाब, हलाल असे मुद्दे कधी थेटपणे तर कधी 'ब' चमूची शक्ती वापरून पुढे आणले जातात. लाभार्थी मतदार झाला नाही तर त्याला भावनिक पातळीवर विचार करायला लावायचा किंवा संभ्रमित करायचे असे धोरण दिसते.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण, अत्याचार अन् खून; आरोपीला फाशीची शिक्षा



ठाणे - भिवंडीमध्ये सात वर्षीय शाळकरी मुलीला आइस्क्रीमचे आमिष दाखवत तिचे अपहरण करून अमानूष अत्याचार केला. मात्र, पीडिता घडलेला प्रकार घरच्यांना सांगेल या भीतीने तिची दगडाने ठेवून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी आरोपीला ठाणे विशेष पोक्सो न्यायालयात बुधवारी (दि. 20 एप्रिल) आरोप निश्चित करून त्याला फाशीची शिक्षा सुनावली ( Accused Sentenced to Death ) आहे, अशी माहिती सरकारी वकील संजय मोरे यांनी दिली आहे. बहुदा ठाणे जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच पोक्सो न्यायायालयाने फाशीची शिक्षा सुनावल्याची वेळ असल्याचे सांगण्यात आले. भरतकुमार धनीराम कोरी (वय 30 वर्षे ), असे फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. दहा तासात केली आरोपीला अटक - भिवंडी तालुक्यातील भोईवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सात वर्षीय शाळकरी मुलगी घराबाहेर खेळत असताना 21 डिसेंबर, 2019 रोजी शनिवारी रात्रीच्या सुमाराला आइस्क्रीमचे आमिष दाखवत नराधम भरतकुमारने अपहरण करुन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर झुडपात नेवून तिची दगडाने ठेचून हत्या केली व पळून गेला होता. 22 डिसेंबर, 2019 रोजी रविवारी सकाळी 6 वाजण्याच्या सुमारास तेथील झुडपात शौचास गेलेल्या एका व्यक्तीला तीचा मृतदेह आढळून आला. त्यामुळे त्याने आरडाओरड करत ही घटना पीडितेच्या कुटुंबियांना सांगितली. त्यानंतर ही धक्कादायक घटना समोर आली होती. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गंभीर गुन्ह्यांची नोंद करुन पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असता नराधम कोरी याला दहा तासात ताब्यात घेऊन अटक केली होती. त्यानंतर याप्रकरणी तपास करत, पोलिसांनी अवघ्या 15 दिवसांत दोषारोपपत्र ठाणे जिल्हा व सत्र विशेष पोक्सो न्यायालयात दाखल केले होते.सुमारे 25 साक्षीदार तपासण्यात आले - मृत पीडितेच्या वतीने सरकारी वकील संजय मोरे यांनी पोक्सो न्यायालयात बाजू मांडत न्यायाधीश कविता शिरभाते यांच्या विशेष न्यायालयाने आरोपी कोरीवर गुन्हा सिद्ध झाल्यानंतर, या सुनावणी दरम्यान सुमारे 25 साक्षीदार तपासण्यात आले असून त्यात दोन अल्पवयीन साक्षीदार होते. शिवाय आरोपीचा डीएनए अहवालही जुळले, हे प्रमुख पुरावे होते. यामुळे आरोपीला फाशीची शिक्षा सुनविण्यात आल्याची माहिती सरकारी वकील संजय मोरे यांनी दिली. विशेष म्हणजे अत्याचार व हत्येचा गुन्हा करण्यापूर्वी आरोपी भरतकुमार कोरी यापूर्वी उत्तर प्रदेशातील त्याच्या गावात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा त्याच्यावर दाखल होता. असेही पोलीस तपासात समोर आले आहे. सर्व साक्षीदार आणि पुरावे तपासल्यानंतर न्यायाधीश शिरभाते यांच्या विशेष पोक्सो न्यायालयाने बुधवारी (दि. 20 एप्रिल) या गुन्ह्यातील आरोपी भरतकुमार कोरी याला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. तीन वर्षे कुटुंबासाठी खरोखरच कठीण - या निकालाबद्दल मृत मुलीचे कुटुंब निकाल जाहीर केल्यानंतर ते आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकले नाहीत. एका नातेवाईकाने सांगितले, "गेली तीन वर्षे कुटुंबासाठी खरोखरच कठीण गेली, त्यांना न्याय मिळेल अशी आशा होती आणि ती सुटली, पण निष्पाप मुलीला काहीही केले तरी परत आणता आले नाही." या प्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक कल्याणराव कर्पे यांनी केला आहे. तर पैरवी अधिकारी म्हणून पोलीस शिपाई डी. ए. तोटेवाड, पोलीस हवालदार व्ही. व्ही. शेवाळे यांनी न्यायालयात वेळोवेळी पुरावे व साक्षीदार सादर केले.

# चॉपरचा धाक दाखवून मित्रांनीच केली मित्राची लूट

ठाणे - कारमध्ये मित्रांना लिफ्ट देणे एका चालकाला भलतेच महागात पडले. निर्जनस्थळ पाहून कारमधील बसलेल्या मित्रांनीच चालकाला चॉपरचा धाक दाखवून लूटमार केली. त्यानंतर विवस्त्र करून चित्रीकरण करत व्हिडिओ बनवून जर पोलिसात तक्रार दिली तर हा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात लूटमार करणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरु केला आहे. प्रथमेश वांगुर्ले व त्याचे दोन अनोखळी साथीदार असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तींची नावे आहेत. असा घडला लुटमारीचा प्रकार : कल्याण पश्चिमेतील चिकनघर येथील रिजन्सी टॉवरमध्ये रहाणारे जगदीश भास्कर पवार ( ४५ ) हे पेशाने शिक्षक असून ते मंगळवारी रात्रीच्या सुमारास आपल्या मारूती इंडीका कारने कल्याण पूर्वेतील श्रीमलंग रोडवरील नांदीवली येथील बस स्टॉप जवळ आले. त्यांच्या ओळखीचे मित्र आरोपी प्रथमेश वांगुर्ले व त्याचे दोन साथीदारानी कार थांबवून त्यांना लिफ्ट मागितली. त्यानंतर आरोपी




कारमध्ये बसले असताना श्रीमलंग रोडवरील ढोके गावाकडे कार निर्जनस्थळी असल्याचे पाहून कारमध्ये अचानक जगदीश पवार यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. एका आरोपीने त्यांना चॉपरचा धाक दाखवून त्यांचा मोबाइल काढून घेतला. त्यानंतर जिवे ठार मारण्याची धमकी देवून त्यांच्या मोबाइलमधून गुगल पे व फोन पे अकाउंटच्या माध्यमातून त्यांच्या खात्यात असलेली रक्कम आरोपीचा मित्र विश्वकर्मा याचे खात्यात ट्रान्सफर करून घेतली. तसेच त्यांच्या पाकीटात असलेली रोख रक्कम असे एकूण ६३ हजार ७०० रुपये आणि ४० हजार किंमतीची गळ्यातील सोन्याची चैन, असा एकूण १ लाख ३ हजार ७०० रुपयांचा रोख रकमेसह मुद्देमाल आरोपींनी जबरी काढून घेतला. विवस्त्र व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी : आरोपी लूटमारी करून इतक्यावरच थांबले नाहीत तर, आरोपींनी पवार यांना विवस्त्र करून त्याचे मोबाइलमध्ये चित्रीकरण केले. त्यानंतर याबाबत कोणाला सांगितले किंवा पोलिसात तक्रार केली तर हा विवस्त्र व्हिडिओ सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी देवून घटनास्थळावरुन पळ काढला. याप्रकरणी जगदीश पवार यांनी बुधवारी २० एप्रिल रोजी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडलेला प्रसंग सांगताच पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.

## एम एच बी कॉलनी पोलीसांकडून अंदाजे 51,75,000/-रु. हेरॉईन हा अंमलीपदार्थ विक्री करणाऱ्या महिलेस अटक.





बोरिवली : एम एच बी कॉलनी पोलीस ठाणे यांनी दहिसर नदिकिनारा, बोरिवली(प), येथून एका महिलेस हेरॉईन हा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या महिलेस आपल्या ताब्यात घेतले. मिळालेल्या माहितीनुसार मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी मुंबई शहरात वाढत असलेल्या अंमली पदार्थांच्या विक्री ला आळा घालण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथकाची नियुक्ती करून अंमलीपदार्थ विक्री करणाऱ्या आरोपीचा शोध घेवुन गुन्हयांना आळा घालण्यासाठी व समुळ नष्ट करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली होती . त्याप्रमाणे मा.अप्पर पोलिस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, कांदिवली (पु), मुबई तसेच मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ११, मुंबई व मा. सहायक पोलीस आयुक्त, बोरिवली विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली व व. पो. नि. सुधीर कुडाळकर, एम एच बी कॉलनी पोलीस ठाणे, मुंबई यांच्या देखरेखीखाली गुन्हे प्रकटीकरण पथक, निगराणी पथक व एटीसी पथक यांची स्वतंत्र पथके तयार करून त्यांना अंमली पदार्थांवर आळा घालण्यासाठी कारवाई करण्याचे सांगितले होते . त्याप्रमाणे दिनांक २३/०४/२२ रोजी गुन्हे प्रतिबंधक गस्ती दरम्यान गस्त करत असताना पोनि किरण सुरसे,सपोनि घोडके ,गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पोउनि संदिप साळवे तसेच मपोह मौळे, पो.शि/ सवळी, पोना /खोत व पो.शि. मोरे यांना " सेंट फ्रांसिस शाळेजवळ, दहिसर नदिकिनारा, बोरिवली(प), मुंबई येथे यांना एक महिला संशयीत रित्या हातात एक पारदर्शक पिशवी घेऊन उभी असल्याची दिसली . सदर महिलेले पोलिसांना बघून त्या ठिकाणावून निघून जाण्याच्या तयारीत असतांना पोलीस निरीक्षक किरण सुरसे, सपोनि घोडके, पोउपनि. साळवे व पोलीस पथकाने मपोह मौळे यांनी तीला शिताफीने ताब्यात घेतलेअसून तिला पिशवीत काय आहे हे विचारले असता ती पिशवी हि तिचीच असून त्यामध्ये हेरॉईन हा अंमली पदार्थ असून तो तिने विक्री करण्यासाठी आणला होता असे पोलिसांना दिलेल्या जबानीत सांगितले . अटक केलेल्या १)मुस्कान दिपक कनोजीया, वय-23 वर्षे, हिच्याकडून पोलिसांनी ३४५ ग्रॅम ची हेरॉईन एकूण रुपये ५१,७५,०००/- रु . मुद्देमाल जप्त केला असून तिला एम एच बी कॉ पोलीस ठाणे यांनी अंमलीपदार्थ विक्री करण्यासाठी आणल्यामुळे तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर महिलेस अटक करण्यात आली आहे सदर आरोपी महीलेचा अधिक कोणत्या गुन्ह्यात सहभाग आहे का तसेच नमूद महीलेचे इतर सहकारी मुंबई मध्ये आणखी कोणत्या ठिकाणी अंमलीपदार्थ विक्री करीत आहेत किंवा कसे याबाबत अधिक तपास करून इतर आरोपीत इसमांना अटक करीत आहोत. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक किरण सुरसे करत असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास चालू आहे. सदरची कारवाई मा. विरेंद्र मिश्रा अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. विशाल ठाकुर, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ११, मुंबई, मा. रेखा भवरे, सहा. पोलीस आयुक्त, बोरिवली विभाग, मुंबई व मा. सुधीर कूडाळकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एम एच बी कॉ पोलीस ठाणे, किरण सुरसे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक बपु घोडके, गुन्हे प्रकटीकरण अधिकारि संदीप साळवे व पथकातील अंमलदार व पो.ह.क्र. / मौळे, पोना/ खोत , पो.शि/ सवळी व पो.शि. /मोरे यांनी पार पाडली.

## महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 चे पोटकलम (1) व (3) अन्वये

### पोलीस उप आयुक्तांचे मनाई आदेश लागू.



विजयकांत सागर
पोलीस उप आयुक्त,

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्याकडून जनतेच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे, आंदोलने, निदर्शने, घेराव, धरणे, सभा, अतिक्रमण हटवणे तसेच दिनांक २८/०४/२०२२ रोजी शब-ए-कद्र, दिनांक ०१/०५/२०२२ रोजी महाराष्ट्र दिन, दिनांक ०३/०५/२०२२ रोजी रमजान ईद (चंद्र दर्शनानुसार १ दिवस मागे पुढे) व अक्षय तृतीया अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांचे जिवित व वित्त सुरक्षित राहण्यासाठी तसेच समाजकंटक व गुंड प्रवृत्तीचे इसम यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करणे सोईचे व्हावे. या करिता श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) मिरा-भाईंदर वसई-विरार यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम ३७ चे पोटकलम (१) व (३) अन्वये मनाई आदेश लागू करून

***खालील बाबींना प्रतिबंध केलेला आहे.***

१. शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, लाठया किंवा शरीरास इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी ____ कोणतीही वस्तु बाळगणे.

२. दगड किंवा क्षेपणास्त्रे किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने जमा करणे.

३. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे.

४. व्यक्तींच्या किंवा प्रेताकृतीच्या प्रतिमेचे प्रदर्शन करणे.

५. सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे, वादय वाजवणे.

६. सभ्यता अगर निती या विरूध्द असतील अशी किंवा राज्यातील शांतता धोक्यात आणतील किंवा ज्यामुळे राज्य शासन उलथुन पडेल अशी भाषणे, हावभाव, चित्रफलक प्रदर्शित करणे. ७. पाच किंवा पाचपेक्षा अधिक लोकांनी एकत्र जमणे, जाहीर सभा घेणे, मिरवणुका काढणे, घोषणा, प्रतिघोषणा देणे इत्यादी कृत्यांना मनाई करण्यात आली आहे.

सदरील मनाई आदेश खालील व्यक्तींना लागु राहणार नाही.

"जो कोणी इसम सरकारी नोकर आहे किंवा ज्यास वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्य निमित्ताने शस्त्र घेणे भाग पडेल, किंवा ज्यास अधिकार प्रदान केलेल्या अधिकायाने सुट दिलेली आहे."

त्याच प्रमाणे सदर आदेश खालील मिरवणुका व जमावास लागु असणार नाहीत.

१. लग्न कार्यासाठी जमलेले लोक.

२. प्रेतयात्रा व अंत्यसंस्कारासाठी काढण्यात आलेल्या मिरवणुका.

३. सरकारी/ निमसरकारी कामासाठी कोर्ट, कचेरी येथे जमलेले लोक.

४. सरकारी संस्था, शैक्षणिक संस्था या ठिकाणी जमलेला समुदाय.

५. पोलीस आयुक्त व त्यांनी प्रदानकेलेल्या पोलीस अधिकायांनी परवानगी दिलेल्या सभा/मिरवणुका.

६. सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी हे कर्तव्य पार पाडत असलेली ठिकाण.

सदरील मनाई आदेश हा मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्राकरिता दिनांक २७/०४/२०२२ रोजीचे ००.०१ वाजे पासुन ते दिनांक ११/०५/२०२२ रोजीचे २४.०० वाजे पर्यंत अंमलात राहील. सदर मनाई आदेशाचा भंग करणा-या विरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन १९५१ चे कलम १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

## तीन लाखाहून अधिक किमतीचा गुटखा नवघर पोलिसांच्या ताब्यात.




भाईंदर : महाराष्ट्र राज्य शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखूजन्य गुटखा हा प्रतिबंधीत माल विक्री साठी घेऊन आलेल्या आरोपीस नवघर पोलिसांनी अटक केली असून आरोपीकडून ३ लाख ७८ हजार ५४८ चा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार दिनांक २४/४/२०२२ रोजी नवघर पोलीस ठाण्याचे पोनि/सुशिलकुमार शिंदे व पोलीस पथक रात्री गस्त घालत असताना बातमी मिळाली होती कि तंबाखूजन्य गुटखा हा प्रतिबंधीत माल गुजरात येथून आणून तो विक्री नवघर भाजी मार्केट भाईंदर पुर्व येथे आणण्यात येणार आहे खात्रीशीर बातमी मिळाल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मिलींद देसाई ,यांनी वपोनि देसाई यांनी पोलीस उप आयुक्त, परि-०१ व सहायक पोलीस आयुक्त नवघर विभाग यांना हि माहिती अवगत करुन नवघर, भाईंदर पूर्व भाजी मार्केट येथे पोनि/सुशिलकुमार शिंदे व स्टाफ यांनी वेगवेगळी पथके तयार करुन सापळा लावून एका मारुती कार मधून गोणीमध्ये असलेला एसएचके. गुटखा, रोकड गोल्ड पानमसाला, बंदर तंबाख्नु, विमल पान मसाला असा माल पोलिसांनी हस्तगत केला असून आरोपी मुनिब रामब्रीक्ष गुप्ता, वय-३६, रा. ओम सी बिल्डींग, कस्तुरीपार्क, भाईंदर पुर्व यास त्याच्याकडे असलेल्या ३,७८,५४८/- रुपयांचा माला सकट रंगेहात पकडण्यात आले आहे. अटक केलेला आरोपी हा या कामात सराईत गुन्हेगार असून त्याच्या वर महाराष्ट्र राज्य शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाकुजन्य गुटखा कब्जात बाळगणे, विक्री करणे बाबत एकूण ०५ गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परि-०१ व डॉ. शशीकांत भोसले, सहायक पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/सुशिलकुमार शिंदे, पोशि/नवनाथ माने, पोशि/ जितेंद्र निवळे, पोशि/ भोये नवघर पोलीस ठाणे यांनी केली आहे. नमुद गुन्हयाचा तपास सपोनि/हनुमंत पडळकर हे करीत आहेत.

## अजान सुरु असताना लाऊडस्पीकरवर गाणे वाजविल्या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षकावर गुन्हा दाखल




औरंगाबाद - अजाण सुरू असताना एक पोलीस उपनिरीक्षकाने मोठ्या आवाजात गाणे लावले म्हणून संबंधीत पोलीसावर सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे कृत्य करणारे पोलीस रेल्वे पोलिसांत उपनिरीक्षक पदावर कार्यरत असल्याची माहिती आहे. किशोर गडप्पा मलकूनाईक असे गुन्हा दाखल झालेल्या पोलिसाचे नाव आहे. घराच्या मागे असलेल्या मस्जिदच्या दिशेने नमाज पठन सुरु असताना मोठ्या आवाजात लाऊडस्पीकरवर गाणे लावले. यातून 2 धर्मात तेढ निर्माण होऊ शकते आणि वेगवेगळ्या गटात शत्रुत्व वाढू शकते. त्यामुळे ही क्रिया चिथावणीखोर असल्याचे पोलिसांच म्हणणे आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सातारा पोलिसांनी दिली आहे. रेल्वे सुरक्षा दलमध्ये पोलीस उप निरीक्षकच्या जबाबदार पदावर असताना सुद्धा त्यांनी पोलीस आयुक्त निखिल गुप्ता यांचे आदेश क्र.जा क्र विशा-4/आदेश/औ बाद/ 2022-1575 औरंगाबाद दि. 22/04/2022 अन्वये प्राप्त आदेश महाराष्ट्र पोलीस अधिनीयम 1951 चे कलम 37(1) व (3) चे उल्लंघन करुन त्यांचे राहते घराचे मागे असणारे मस्जितच्या दिशेने लाऊडस्पीकर ठेवून नमाज पठन करण्याचे वेळी लाऊडस्पीकरवर मोठ्या आवाजात गाणे संगीत वाजवाले. त्या भागातील नागरिकांनी याबाबत नियंत्रण कक्षात तक्रार दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मुलीला सासरी पाठवले नाही म्हणून जावयाने केला सासऱ्याचा खून, आरोपी अटकेत



अकोला - तेल्हारा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाथर्डी येथील पहाट रक्तरंजित ठरली. जावयाने सासऱ्याचा धारदार शस्त्राने हत्या केल्याची घटना घडली आहे. पत्नीला सासरी न पाठविल्याचा राग मनात ठेवून जावयाने सासऱ्याचा खून केला. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, तेल्हारा पोलिसांनी आरोपी जावयास दोन तासांच्या आत अटक केली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पाथर्डी येथील मृत गजानन पवार ( वय ५५ वर्षे ) यांच्या मुलीचा काही वर्षांपूर्वी उमरी येथे विवाह झाला होता. गेल्या चार महिन्यापासून मुलगी माहेरी आलेली होती. २३ एप्रिल रोजी आरोपी जावई निलेश विठ्ठल धुरंदर ( वय ३५ वर्षे, रा. उमरी ) हा आपल्या पत्नीला सासरी घेऊन जायला चार वाजेच्या दरम्यान गेला होता. मात्र, वडील घरी नाहीत त्यांना येऊ द्या नंतर बघू, असे म्हणत जावई धुरंदर हे थांबले. काही वेळाने मुलीचे वडील हे घरी आल्यानंतर त्यांच्या सोबत जावई वाद घालून तेथून निघून गेला. त्यानंतर रात्री अंगणामध्ये गजानन पवार हे खाटेवर झोपलेले असताना जावयाने त्यांना मध्यरात्री ३.३० वाजेच्या सुमारास सासऱ्याचा झोपेतच मानेवर धारदार चाकूने वार करत खून केला. त्यानंतर मृतक गजानन पवार यांनी अरडाओरड केली असता मृताची मुलगी धावत बाहेर आली. तिचा पती हातामध्ये चाकू घेऊन उभा होता. यावेळी पुन्हा वार करणार तोच मुलीने आरोपी पतीला ढकलून आरडाओरड केली. तेव्हा आरोपी तेथून पसार झाला.गजानन पवार यांना वाचवण्याचा प्रयत्न केले. मात्र, रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल होऊन आरोपीचा शोध घेण्यासाठी वेगवेगळे पथक तयार करून जवळपास दोन तास शोध घेतला. खाकटा या गावानजीक पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या. आरोपीच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीवरून तेल्हारा पोलीस ठाण्यात कलम ३०२, ५०६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी अवघ्या दोन तासात आरोपीला अटक केली. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी रितू खोकर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार ज्ञानोबा फड, पोलीस उपनिरीक्षक रमेश धामोडे, पोलीस शिपाई स्वप्नील सरोदे, योगेश उमक, राजेश्वर सोनोने, उमेश शिनगारे, अक्षय खोने, गजानन इंगळे, जयंत सोनटक्के, अनिल सिरसाट यांनी केली.

## दारुसाठी पैसे मागितल्यामुळे खून



पुणे, वाघोलीजवळील आव्हाळवाडी परिसरात महिनाभरापूर्वी तरुणाचा मृतदेह सापडला होता. या तरुणाने दारूसाठी पैसे मागितल्याच्या रागातून ओळखीतील तरुणाने दांडक्याने केलेल्या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी लोणीकंद पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. संजयकुमार चौधरी (वय २८, रा. गाडेवस्ती, वाघोली, मूळ रा. जालोन, उत्तर प्रदेश) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी सागर मोहित (३१, रा. वाघोली बाजारतळ, मूळ रा. कल्याण) याला अटक करण्यात आली आहे. याबाबत पोलिस उपनिरीक्षक महादेव लिंगे यांनी तक्रार दिली आहे. २८ मार्च रोजी आव्हाळवाडी बाजार तळ मैदान येथे ही घटना घडली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आव्हाळवाडीच्या बाजारतळ मैदानाच्या भिंतीलगत २८ मार्च रोजी सायंकाळी चौधरी याचा मृतदेह नागरिकांना दिसला होता. चौधरीला दारूचे व्यसन असल्यामुळे पडून मृत्यू झाला असावा, असे सुरुवातीला वाटत होते. या प्रकरणी लोणीकंद पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठविला होता. त्याचा अहवाल आल्यानंतर चौधरीचा मारहाणीत मृत्यू झाल्याचे समोर आले. त्यानुसार लोणीकंद पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गजानन पवार, सहायक निरीक्षक निखिल पवार, उपनिरीक्षक सूरज गोरे यांच्या पथकाने तपास सुरू केला.

अशी घडली घटना

सागर आणि चौधरी एकाच परिसरात राहतात. चौधरीने दारू पिण्यासाठी सागरकडे पैसे मागितले. त्या रागातून २८ मार्चला सायंकाळी सागरने चौधरीला दांडक्याने बेदम मारहाण केली. यात त्याचा मृत्यू झाला. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने सागरला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता २८ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला.

## आजारपणाने ग्रासलेल्या महिलेला ज्योतिषाने लुबाडले; नऊ लाखांचे दागिने नेले, बदल्यात कोळसे दिले



मुंबई: बोरिवलीतील एका महिलेला विविध आजारांनी ग्रासले होते. डॉक्टरकडे जाऊन काहीच फायदा होत नसल्याने त्या महिलेने ज्योतिष्याची मदत घेतली. त्या ज्योतिषाने होम-हवन, मंत्र, जप करण्याच्या बहाण्याने नऊ लाखांच्या दागिन्यांवर डल्ला मारला आणि कोळसे देऊन पसार झाला. त्या महिलेच्या तक्रारीवरून बोरिवलीच्या एमएचबी कॉलनी पोलिस ठाण्यात ज्योतिषी आणि त्याच्या साथीदारावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बोरिवलीच्या आयसी कॉलनीमध्ये कुटुंबियांसह राहणाऱ्या सुवर्णा (बदललेले नाव) यांना अनेक आजारांनी ग्रासले होते. सुवर्णा यांच्या पतीचा सोन्याचे दागिने खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. सुवर्णा यांना रात्री झोप लागत नव्हती आणि कशीबशी झोप लागलीच तर विचित्र स्वप्न पडल्याने त्याची झोप उडायची. अनेक डॉक्टरांना दाखवल्यानंतर ही त्यांना बरे वाटत नव्हते. त्यामुळे सुवर्णा यांच्या पतीने ज्योतिषाची मदत घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी जस्ट डायलवरून काही ज्योतिषींचे मोबाइल क्रमांक मिळवले. हरी दर्शन आचार्य नावाच्या ज्योतिषाला त्यांनी संपर्क केला. त्यांची समस्या ऐकल्यानंतर हरी दर्शनने आपण पूजेमध्ये असून सुवर्णा आणि तिच्या पतीचा फोटो पाठविण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी व्हॉट्सॲपवर फोटो पाठविले. त्यानंतर, घरावर कुणाची तरी वक्रदृष्टी असून ती घालवावी लागेल असे सांगून हरी दर्शनने शिष्य नरेश याला सुवर्णा यांच्या घरी पाठवले. नरेश याने पूजेसाठी साडेसात हजार रुपये घेऊन एक लिंबू त्यांना दिले आणि उशीखाली ठेवून झोपण्यास सांगितले. नरेश याने मंत्रजप केलेले लिंबू देऊनही काहीच फरक पडला नसल्याने सुवर्णा हिने हरी दर्शन यांना पुन्हा संपर्क केला. हरी दर्शनने तुम्ही काळजी करू नका, मी स्वतःच येतो, असे सांगून तो त्यांच्या घरी गेला. हरी दर्शनने मंत्रतंत्रासाठी आणखी पाच हजार रुपये सुवर्णा यांच्याकडून घेतले. घरामध्ये कुणीही पुरुष व्यक्ती नको, तसे असल्यास मंत्र-जपाचा काहीच उपयोग होणार नाही, असे त्याने सांगितल्यावर सुवर्णा यांनी पती आणि मुलास घराबाहेर पाठवले. हरी दर्शन घरी आल्यानंतर त्याने घरातील सर्व दागिने हॉलमध्ये आणण्यास सांगितले. सुमारे ९ लाखांचे दागिने त्यांनी एका गाठोड्यात बांधले. सुवर्णा यांना एक लिंबू देऊन पूर्ण घरभर फिरवण्यास सांगितले तर त्यांच्या मुलीला पाण्याची बाटली आणण्यासाठी घराबाहेर पाठवले. याचदरम्यान त्याने दागिने काढून त्यामध्ये कोळसे बांधले. कोळसे बांधलेले गाठोडे एका पेटीत ठेवले. पाच वर्षे ही पेटी उघडून नका. ही पेटी उघडल्यास सुवर्णा आणि त्यांच्या पतीचा मृत्यू होईल, असेही हरिदर्शनने सांगितले. मंत्रजप, होम हवन करूनही काहीच फरक जाणवत नसल्याने सुवर्णा यांनी हरी दर्शन यांना संपर्क केला. त्यावेळी तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. संशय आल्याने सुवर्णा आणि त्यांच्या पतीने पेटी उघडले असताना गाठोड्यात दागिन्यांऐवजी कोळसे सापडले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898